सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**(सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१)**

# महाराष्ट्र मालमोटार अंतिम स्थानक (जागेचे विनियमन) अधिनियम, १९९५

(दिनांक २६ जानेवारी २०१६ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XXXI of 1997**

# The Maharashtra Truck Terminal (Land's Regulation) Act, 1995

(*As modified upto 26th January 2016*)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, वाई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१६

**(किंमत रु. ३०·००)**

(सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१)

## महाराष्ट्र मालमोटार अंतिम स्थानक (जागेचे विनियमन) अधिनियम, १९९५

### अनुक्रमणिका


उद्देशिका. पृष्ठे

कलमे.

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती. .. .. .. .. १
२. व्याख्या. .. .. .. .. .. २

**प्रकरण दोन**

**नियंत्रण क्षेत्र घोषित करणे व मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाची (ट्रक व टर्मिनल ऑथॉरिटी) स्थापना**

३. नियंत्रण क्षेत्र घोषित करणे. .. .. .. .. .. २
४. मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाची स्थापना. .. .. .. ३
५. मालमोटारीच्या अंतिम स्थानकाचे क्षेत्र घोषित करणे. .. .. .. ३
६. मालमोटारीच्या (ट्रकच्या) अंतिम स्थानकाव्यतिरिक्त कोणत्याही इतर ठिकाणी स्वतःच किंवा एजंट म्हणून मालवाहतूक करण्यास किंवा माल चढविण्यास व उतरविण्यास व्यक्तीस मनाई. .. ३
७. विवक्षित परिवाहनांच्या बाबतीत कलम ६ च्या तरतुदी लागू नसणे. .. .. ४
८. मालमोटार अंतिम स्थानकामधील (ट्रक टर्मिनल) जागा इत्यादींचा वापर करण्यास परवानगी देणे. ४

**प्रकरण तीन**

**मालमोटार अंतिम स्थानक (ट्रक टर्मिनल) प्राधिकरणाची रचना**

९. प्राधिकरणाची रचना. .. .. .. .. .. ४
१०. पदावधी. .. .. .. .. .. ५
११. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शासकीय सदस्य यांच्या सेवेच्या शर्ती. .. .. ५
१२. अशासकीय सदस्यांचा राजीनामा. .. .. .. .. .. ५
१३. सदस्यांची तात्पुरती गैरहजेरी. .. .. .. .. .. ६
१४. सदस्यांची निरर्हता. .. .. .. .. .. ६
१५. सदस्यांना काढून टाकणे. .. .. .. .. .. ६
१६. रिकामी पदे भरणे. .. .. .. .. .. ७
१७. कार्यवाही उचित व विधिग्राह्य असल्याचे मानणे. .. .. .. ७
१८. प्राधिकरणाची सभा. .. .. .. .. .. ७

## अनुक्रमणिका


| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १९. | विशिष्ट प्रयोजनासाठी प्राधिकरणाशी व्यक्तींना तात्पुरते सहयोगी करून घेणे. .. | ८ |
| २०. | समित्यांची रचना. .. .. .. .. | ८ |


### प्रकरण चार

#### प्राधिकरणाची रचना आणि प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी


| | | |
|---|---|---|
| २१. | अधिनियमाच्या अंमलबजावणीचे काम ज्यांच्याकडे सोपवावयाचे ते प्राधिकारी. .. | ८ |
| २२. | अधीक्षण व नियंत्रण. .. .. .. .. | ८ |
| २३. | मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये. .. .. .. | ८ |
| २४. | अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक. .. .. .. .. | ९ |
| २५. | अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाशर्तीचे विनियमांद्वारे विनियमन करणे. .. | ९ |
| २६. | भविष्य निर्वाह निधी. .. .. .. .. | १० |
| २७. | प्राधिकरणाचा खर्च. .. .. .. .. | १० |


### प्रकरण पाच

#### प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये


| | | |
|---|---|---|
| २८. | प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये. .. .. .. .. | १० |
| २९. | फी बसवण्याचे प्राधिकरणाचे अधिकार. .. .. .. .. | ११ |
| ३०. | प्राधिकरणांना अनुदान देणे, खर्चातील वाटा उचलणे, इत्यादींचा अधिकार. .. | ११ |


### प्रकरण सहा

#### अर्थसंकल्प, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा, इत्यादी


| | | |
|---|---|---|
| ३१. | प्राधिकरणास अर्थसंकल्प सादर करणे. .. .. .. .. | ११ |
| ३२. | अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देणे. .. .. .. .. | १२ |
| ३३. | मान्यता दिलेला अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासनास सादर करणे. .. .. | १२ |
| ३४. | पूरक अर्थसंकल्प. .. .. .. .. | १२ |
| ३५. | प्राधिकरणाच्या मत्तेचा विनियोग. .. .. .. .. | १२ |
| ३६. | मालमोटार अंतिम स्थानक निधी. .. .. .. .. | १२ |
| ३७. | रक्कम कर्जाऊ घेण्याचा प्राधिकरणाचा अधिकार. .. .. .. | १३ |
| ३८. | ठेवी. .. .. .. .. | १३ |
| ३९. | लेखे व लेखापरीक्षा. .. .. .. .. | १३ |
| ४०. | लेख्यांची समवर्ती व विशेष परीक्षा. .. .. .. .. | १३ |

# अनुक्रमणिका

## प्रकरण सात

### जमिनीचे संपादन


| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| ४१. | या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जमीन संपादन करण्याचा अधिकार. .. .. | १३ |
| ४२. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने किंवा इतर कोणत्याही सांविधिक महामंडळाने हस्तांतरित केलेल्या जमिनी, इत्यादी मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाकडे निहित होणे. .. | १४ |
| ४३. | शासकीय जमीन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे. .. .. | १४ |
| ४४. | जमीन इत्यादींची विल्हेवाट लावण्याचा प्राधिकरणाचा अधिकार. .. .. | १४ |


## प्रकरण आठ

### अपराध व शास्ती


| | | |
|---|---|---|
| ४५. | अपराध व शास्ती. .. .. .. .. | १४ |
| ४६. | कंपन्यांनी केलेले अपराध. .. .. .. .. | १६ |
| ४७. | अपराधाची दखल व न्याय चौकशी. .. .. .. | १६ |
| ४८. | वाढीव शास्ती लादण्याचा दंडाधिकाऱ्यांचा अधिकार. .. .. | १६ |
| ४९. | अपराधांचा सामोपचाराने निकाल करणे. .. .. .. | १६ |


## प्रकरण नऊ

### संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| ५०. | तपासणी, चौकशी, सादर करणे इत्यादी. .. .. .. | १७ |
| ५१. | अधिकारी, कर्मचारी किंवा सदस्य यांचे प्राधिकृत अधिकाऱ्यास माहिती पुरविण्याबाबतचे कर्तव्य. | १८ |
| ५२. | लेखापुस्तके व इतर दस्तऐवज, इत्यादी जप्त करणे. .. .. | १८ |
| ५३. | राज्य शासनाचे नियंत्रण. .. .. .. .. | १८ |
| ५४. | वार्षिक अहवाल. .. .. .. .. | १८ |
| ५५. | प्राधिकरणाचा अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य व इतर अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे. .. .. .. | १९ |
| ५६. | सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कृतीचे संरक्षण. .. .. | १९ |
| ५७. | प्राधिकरणाला देय असणाऱ्या रकमांची वसुली. .. .. | १९ |
| ५८. | प्राधिकरणाच्या जमिनी, इमारती, इत्यादींना भाडे नियंत्रण कायदा लागू नसणे. .. | १९ |
| ५९. | नियम तयार करण्याचा अधिकार. .. .. .. | १९ |
| ६०. | विनियम करण्याचे अधिकार. .. .. .. .. | २० |
| ६१. | अडचणी दूर करणे. .. .. .. .. | २० |

## (सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१)

## महाराष्ट्र मालमोटार अंतिम स्थानक (जागेचे विनियमन) अधिनियम, १९९५

[राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १२ मे १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**नागरी क्षेत्रांत माल चढविण्याच्या व उतरविण्याच्या संबंधात मालवाहने (गुड्स कॅरेजेस) व परिवाहने (ट्रान्सपोर्ट व्हेइकल्स) यांच्या वाहतुकीचे विनियमन करणे, मालवाहने किंवा परिवाहने यांमधून वाहून नेण्यात येणारा माल गोळा करणे, तो पुढे पाठविणे किंवा त्याचे वितरण करणे या व्यवसायात गुंतलेल्या वाहतूक कंपन्या, बुकिंग एजंट व इतर यांची कार्यालये व गोदामे यांचे स्थान निश्चित करणे, मालमोटारींच्या अंतिम स्थानकाचे व्यवस्थापन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे यांकरिता "मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण"(ट्रक टर्मिनल ऑथॉरिटी) स्थापन करणे व त्यांच्याशी सबंधित किंवा त्यांना पूरक किंवा आनुषंगिक असणाऱ्या बाबींसाठी तरतूद करणे यांकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, वेगाने वाढणारी लोकसंख्या व तितक्याच वेगाने वाढणारे वाणिज्यिक व्यवहार यांच्यामुळे नागरी क्षेत्रांतील व विशेषतः मुंबई महानगर प्रदेशातील वाहनांची दाटी व वाहतुकीच्या समस्या यांत प्रचंड वाढ झालेली आहे;

१९६४ चा महा. २० १९८३ चा महा. ४२. **आणि ज्याअर्थी**, वाहतुकीतील दाटी काही प्रमाणात कमी करण्याकरिता 'महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विनियमन) अधिनियम, १९६३', याखाली कांदे, बटाटे, सुका मेवा, मसाल्याचे पदार्थ व मसाले इत्यादी; साखर, गूळ, तूप, आटा व नारळ यांसारख्या काही कृषि उत्पादनांचे घाऊक बाजार मुंबईबाहेर नेण्यासाठी आणि 'मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजार (स्थान नियमन) अधिनियम, १९८३' याच्या तरतुदीअन्वये कापड आणि लोखंड व पोलाद यांच्या बाजार क्षेत्रांच्या व त्यांच्या घाऊक बाजारपेठांच्या बृहन्मुंबईतील जागांचे विनियमन करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत;

**आणि ज्याअर्थी**, विनिर्दिष्ट क्षेत्रांत माल चढविणे व उतरविणे या संबंधात मालवाहने वा परिवाहने यांच्या वाहतुकीचे विनियमन करून त्याद्वारे गर्दी कमी करण्याच्या प्रक्रियेला गती देणे, मालवाहने व परिवाहने यांमधून वाहून नेण्यात येणारा माल गोळा करणे, तो पुढे पाठविणे किंवा त्याचे वितरण करणे या व्यवसायात गुंतलेल्या वाहतूक कंपन्या, बुकिंग एजंट व इतर यांची कार्यालये व गोदामे यांच्या जागांचे विनियमन करणे, अशा जागांचे व्यवस्थापन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे यांकरिता मालमोटारी अंतिम स्थानक प्राधिकरण (ट्रक टर्मिनल ऑथॉरिटी) स्थापन करणे व त्यांच्याशी संबंधित क्षेत्रांसाठी किंवा त्यांना पूरक किंवा आनुषंगिक असणाऱ्या बाबींची तरतूद करणे, यांकरिता ताबडतोब एक कायदा करणे अधिक इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सेहेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'महाराष्ट्र मालमोटार अंतिम स्थानक (जागेचे विनियमन) अधिनियम, १९९५' असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो मुंबई महानगर प्रदेशात ताबडतोब अंमलात येईल. इतर कोणत्याही क्षेत्रात तो राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या तारखेस अंमलात येईल; आणि निरनिराळ्या तारखा नेमून देता येतील.

(४) कलम ३ च्या पोट-कलम (१) खालील अधिसूचनेत नेमून देण्यात येईल अशा तारखेस या अधिनियमाच्या तरतुदी एखाद्या नियंत्रण क्षेत्रास किंवा त्याच्या भागास लागू होतील; व निरनिराळ्या नियंत्रण क्षेत्रासाठी किंवा एखाद्या नियंत्रण क्षेत्राच्या निरनिराळ्या भागांसाठी, क्षेत्रांसाठी निरनिराळ्या तारखा नेमून देता येतील.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "नियत दिवस" म्हणजे, ज्या दिवशी या अधिनियमाच्या तरतुदी कोणत्याही नियंत्रण क्षेत्रास किंवा त्याच्या भागास लागू होतील, तो दिवस;

(ब) "प्राधिकरण" किंवा "मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण" (ट्रक टर्मिनल ऑथॉरिटी) म्हणजे, कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेले मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण;

(क) "मुंबई महानगर प्रदेश" म्हणजे, 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४' याच्या अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र; १९७५ चा महा. ४.

(ड) "अध्यक्ष" म्हणजे, प्राधिकरणाचा अध्यक्ष;

(ई) "मुख्य कार्यकारी अधिकारी" म्हणजे, प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी;

(फ) "नियंत्रण क्षेत्र" म्हणजे, कलम ३ अन्वये नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र;

(ग) "सदस्य" म्हणजे, प्राधिकरणाचा सदस्य होय, आणि यामध्ये, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश होतो;

(ह) "महानगर आयुक्त" म्हणजे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा महानगर आयुक्त;

(आय) "विनियम" म्हणजे, या अधिनियमाखाली तयार केलेले विनियम;

(ज) "नियम" म्हणजे, या अधिनियमाखाली तयार केलेले नियम;

(के) "अंतिम स्थानक" किंवा "मालमोटार अंतिम स्थानक" (ट्रक टर्मिनल) म्हणजे, कलम ५ अन्वये, मालमोटारींचे अंतिम स्थानक म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र;

(ल) "मालमोटार अंतिम स्थानक निधी" (ट्रक टर्मिनल फंड) म्हणजे, कलम ३६ अन्वये स्थापन करण्यात आलेला निधी;

(म) या अधिनियमात वापरण्यात आलेले व यात व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, 'मोटार वाहन अधिनियम, १९८८' यात त्यांना जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील. १९८८ चा ५९.

## प्रकरण दोन

### नियंत्रण क्षेत्र घोषित करणे व मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाची (ट्रक टर्मिनल ऑथॉरिटी) स्थापना

नियंत्रण क्षेत्र घोषित करणे. **३.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणतेही क्षेत्र नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित करू शकेल व त्याच अधिसूचनेद्वारे किंवा इतर कोणत्याही तत्सम अधिसूचनेद्वारे वेळोवेळी या अधिनियमाच्या तरतुदी अशा क्षेत्रास किंवा त्याच्या भागास ज्या तारखेपासून लागू होतील ती तारीख नेमून देऊ शकेल.

(२) कोणतेही क्षेत्र, नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता, पोट-कलम (१) अन्वये कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी, राज्य शासन, **राजपत्रात**, तसेच प्रस्तावित नियंत्रण क्षेत्रात खप असणाऱ्या किमान दोन वृत्तपत्रांत जाहीर नोटीस प्रसिद्ध करील किंवा करतील, व त्याद्वारे, अशा नोटिशीत वर्णन केलेल्या क्षेत्राच्या संबंधात अशी अधिसूचना काढण्याचा आपला इरादा जाहीर करील; व अशी जाहीर नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत त्यावरील लेखी हरकती व सूचना मागवील.

विहित मुदतीच्या आत राज्य शासनाकडे आलेल्या कोणत्याही हरकतींवर किंवा सूचनांवर राज्य शासनाकडून विचार केला जाईल.

(३) नियंत्रण क्षेत्राच्या हद्दी दर्शविणारा नकाशा, पोट-कलम (२) खालील अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा जागी निरीक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात येईल.

मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाची स्थापना.

४. (१) कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये कोणतेही क्षेत्र, नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एका किंवा त्याहून अधिक नियंत्रण क्षेत्रांसाठी एक मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण (ट्रक टर्मिनल ऑथॉरिटी) स्थापन करील किंवा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी निरनिराळी मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण स्थापन करील.

(२) प्रत्येक मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण हे अखंड परंपरा व सामायिक मुद्रा असलेला एक निगमनिकाय असेल व निगमनिकाय म्हणून ज्याला जे नाव असेल त्या नावाने त्याला दावा लावता येईल किंवा त्या नावाने त्याच्यावर दावा लावता येईल व तो स्थावर व जंगम अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करणे, ती धारण करणे व तिची विल्हेवाट लावणे तसेच या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी करार करणे व आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करणे यासाठी सक्षम असेल.

(३) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मालमोटार अंतिम स्थानिक प्राधिकरण हे, सर्व प्रयोजनांकरिता स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.

माल-मोटारीच्या अंतिम स्थानकाचे क्षेत्र घोषित करणे.

५. राज्य शासनाची अथवा राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा इतर प्राधिकरणाची पूर्व मान्यता मिळविल्यानंतर मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण हे, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, जागा व प्रसीमा यांसह एक किंवा अधिक क्षेत्र, एका किंवा अधिक नियंत्रण-क्षेत्रांसाठी, मालमोटारीचे अंतिम स्थानक म्हणून, घोषित करील आणि मालवाहने किंवा परिवाहने यांचे आगमन व निर्गमन यासाठी किंवा अशा मालवाहनांमध्ये किंवा परिवाहनांमध्ये माल चढवण्याच्या किंवा त्यातून माल उतरविण्याच्या प्रयोजनार्थ, असा माल गोळा करणे, पुढे पाठवणे, त्याचे वितरण करणे किंवा त्याची वाहतूक करणे हा व्यवसाय चालवण्यासाठी मालवाहनाच्या परवानाधारकाला किंवा एजंटाला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला त्याचा वापर करता येईल.

मालमोटारीच्या (ट्रकच्या) अंतिम स्थानका-व्यतिरिक्त कोणत्याही इतर ठिकाणी स्वतःच किंवा एजंट म्हणून मालवाहतूक करण्यास किंवा माल चढविण्यास व उतरविण्यास व्यक्तीस मनाई.

१९८८ चा ५९. ६. 'मोटार वाहन अधिनियम, १९८८' यात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिवशी आणि त्या दिवसापासून,—

(१) कोणतीही व्यक्ती, मालमोटार अंतिम स्थानक खेरीजकरून, नियंत्रण क्षेत्रामध्ये माल-वाहनामधून किंवा परिवाहनामधून वाहून नेण्यात आलेला अथवा वाहून नेण्यात यावयाचा माल गोळा करणे, तो पुढे पाठवणे किंवा त्याचे वितरण करणे, हा व्यवसाय स्वतःच किंवा एजंट म्हणून किंवा अन्य प्रकारे करणार नाही;

(२) कोणत्याही प्रदेशामधील कोणत्याही मालवाहनांद्वारे किंवा परिवाहनांद्वारे, हा अधिनियम ज्या क्षेत्राला लागू आहे अशा कोणत्याही नियंत्रण क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये मालाची वाहतूक केली जाते त्या बाबतीत मालवाहन किंवा परिवाहन यांच्या संबंधात एका प्रदेशासाठी दिलेल्या किंवा इतर कोणत्याही प्रदेशासाठी प्रतिस्वाक्षरित केलेल्या परवान्यामध्ये पुढील शर्त अंतर्भूत असल्याचे मानण्यात येईल :—

१९९५ चा महा. "कोणत्याही व्यक्तीला किंवा परवानाधारकाला किंवा त्याच्या एजंटाला, मालमोटारीचे अंतिम स्थानक खेरीजकरून, 'महाराष्ट्र मालमोटार अंतिम स्थानक (जागेचे विनियमन) अधिनियम, १९९५' ज्या क्षेत्राला लागू आहे अशा नियंत्रण क्षेत्रामधील किंवा त्याच्या भागातील कोणत्याही ठिकाणी मालवाहन किंवा परिवाहन यामध्ये माल चढविता अगर त्यातून माल उतरविता येणार नाही."

विवक्षित परिवाहनांच्या बाबतीत कलम ६ च्या तरतुदी लागू नसणे.

७. कलम ६ मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पुढील वाहनांना लागू असणार नाही :—

(अ) पूर्णपणे आणि केवळ एकाच व्यक्तीसाठी आणि नियंत्रण क्षेत्रातील कोणत्याही एका ठिकाणी माल चढविणारी किंवा उतरविणारी व्यक्ती;

(ब) नियंत्रण क्षेत्रातील कोणत्याही एका ठिकाणाहून माल भरणारी आणि तोच माल नियंत्रण क्षेत्रातील इतर कोणत्याही ठिकाणी उतरविणारी व्यक्ती;

(क) केवळ पुढीलपैकी कोणाचीही मालवाहतूक करणारी मालवाहने किंवा परिवाहने :—

(एक) **महावाणिज्यदूत** (कॉन्सल जनरल), वाणिज्यदूत (कॉन्सल), उप-वाणिज्यदूत (व्हॉईस कॉन्सल), वाणिज्यिक एजन्ट (कॉन्सलर-एजन्ट), प्रो-कॉन्सल किंवा इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे विदेशी राज्याचे **कौन्सल-डी-कॅरियर्स**;

(दोन) राज्य शासनाचे किंवा केन्द्र शासनाचे अथवा राज्य शासनाने किंवा केन्द्र शासनाने स्थापन केलेल्या कोणत्याही कंपन्यांचे किंवा उपक्रमांचे विभाग किंवा कार्यालये;

(तीन) राज्याच्या किंवा केंद्राच्या कोणत्याही अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेली सांविधिक महामंडळे.

मालमोटार अंतिम स्थानकामधील (ट्रक टर्मिनल) जागा इत्यादींचा वापर करण्यास परवानगी देणे.

८. 'मोटार वाहन अधिनियम, १९८८' याच्या कलम ९३ च्या तरतुदींनुसार मालवाहनामधून वाहून नेण्यात आलेला माल गोळा करणे, पुढे पाठवणे किंवा त्याचे वितरण करणे या व्यवसायात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीने अथवा एजन्टाने अर्ज केल्यावर, मालमोटार अंतिम स्थानक (ट्रक टर्मिनल) प्राधिकरण हे, अशा व्यक्तीला किंवा एजन्टाला, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा अटींवर व शर्तींवर मालमोटार (ट्रक) अंतिम स्थानकामधील जागेचा, सोयींचा आणि सेवेचा वापर करण्यास परवानगी देईल. १९८८ चा ५९.

## प्रकरण तीन

### मालमोटार अंतिम स्थानक (ट्रक टर्मिनल) प्राधिकरणाची रचना

प्राधिकरणाची रचना.

९. (१) प्राधिकरण हे, राज्य शासनाने नियुक्त केलेले अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर सात सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.

(२) महानगर आयुक्त हा, मुंबई महानगर प्रदेशातील प्राधिकरणाचा पदसिद्ध अध्यक्ष असेल. मुंबई महानगर प्रदेशाबाहेर तत्सम प्राधिकरणे स्थापन झाल्यास संबंधित विभागीय आयुक्त हा, पदसिद्ध अध्यक्ष असेल. राज्य शासन, एका पूर्णकालिक मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करील. मुख्य कार्यकारी अधिकारी हा, राज्य शासनाच्या मते जिला या अधिनियमाखालील प्राधिकरणाचे कामकाज चालविणे व त्याची व्यवस्था पाहणे यासाठी आवश्यक असणारा प्रशासकीय व व्यवस्थापकीय अनुभव आहे अशी व्यक्ती असेल, इतर सात सदस्य पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) राज्य शासनाच्या मते, ज्यांना, नगरपालिका किंवा सार्वजनिक प्रशासन, नगर नियोजन आणि ग्रामीण क्षेत्र नियोजन, सार्वजनिक परिवहन, वाहतूक नियंत्रण किंवा वित्तव्यवस्था यासंबंधीचे विशेष ज्ञान आहे किंवा त्याचा प्रत्यक्ष अनुभव आहे असे चार शासकीय सदस्य;

(ब) तीन शासकीय सदस्य, त्यांपैकी एक सदस्य मालवाहनांमधून वाहून नेण्यात येणारा माल गोळा करणे, पुढे पाठवणे व त्याचे वितरण करणे हा व्यवसाय करणाऱ्या व नियंत्रण क्षेत्रामध्ये ज्यांची कार्यालये आहेत, अशा व्यक्तीचा प्रतिनिधी असेल;

(३) या कलमान्वये नेमण्यात आलेला अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नावे आणि इतर सदस्यांची पदनामे किंवा प्रकरणपरत्वे, नावे **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील आणि अशा प्रसिद्धीनंतर, प्राधिकरणाची यथोचितरीत्या रचना करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

**१०.** (१) प्रत्येक अशासकीय सदस्याचा पदावधी या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून कोणत्याही कारणामुळे राज्य शासनाने हा पदावधी मुदतीपूर्वी समाप्त केला नसल्यास, सामान्यतः **राजपत्रामध्ये** त्याची नेमणूक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षांचा असेल. पदावधी.

(२) एखादी व्यक्ती, कोणतेही पद धारण करत असल्यामुळे किंवा ती संसदेची, राज्य विधानमंडळाची सदस्य असल्यामुळे किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाची, संघटनेची किंवा मंडळाची—मग ते कायद्याने संस्थापित झालेले असो किंवा नसो, सदस्य असल्यामुळे या प्राधिकरणाची सदस्य झाली असेल किंवा सदस्य म्हणून तिची नियुक्ती झाली असेल त्याबाबतीत, ती व्यक्ती जेव्हा ते पद धारण करण्याचे बंद करील अथवा प्रकरणपरत्वे, सदस्य असण्याचे बंद होईल तेव्हा ती त्यानंतर ताबडतोब, या प्राधिकरणाची सदस्य असण्याचे बंद होईल.

**११.** (१) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे पारिश्रमिक आणि सेवेच्या अन्य शर्ती राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निर्धारित करील त्याप्रमाणे असतील. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शासकीय सदस्य यांच्या सेवेच्या शर्ती.

(२) प्रत्येक अशासकीय सदस्याला, असा सदस्य, म्हणून प्राधिकरणाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही कामाकरिता उपस्थित राहण्यासाठी त्याने स्वतः केलेला खर्च भागविण्यासाठी राज्य शासन वेळोवेळी, आदेशाद्वारे निर्धारित करील असे भत्ते मिळतील.

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे पारिश्रमिक आणि अशासकीय सदस्यांचे भत्ते, 'मालमोटार अंतिम स्थानक निधीमधून' देण्यात येतील.

(४) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जर संसदेच्या किंवा राज्य विधान-मंडळाच्या सदस्यास प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले असेल तर त्याला देय असलेले पारिश्रमिक व भत्ते —

१९५९ चा १०. (अ) जर तो संसदेचा सदस्य असेल तर, संसद (निरर्हता निवारण) अधिनियम, १९५९ यात व्याख्या केल्याप्रमाणे पूरक भत्त्यांपेक्षा अधिक नसतील;

१९५६ चा मुंबई ५२. (ब) जर तो राज्य विधानमंडळाचा सदस्य असेल तर महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियमाच्या नोंद ११ अन्वये त्याला अनुज्ञेय असलेल्या पूरक भत्त्यांपेक्षा अधिक नसतील.

**१२.** कोणताही अशासकीय सदस्य, कोणत्याही वेळी, राज्य शासनाला स्वतःच्या सहीने लिहिलेले पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल आणि तो स्वीकारण्यात आल्यानंतर त्या सदस्याचे पद रिकामे होईल. अशासकीय सदस्यांचा राजीनामा.

सदस्यांची तात्पुरती गैरहजेरी.

**१३.** जर कोणताही सदस्य विकलतेमुळे किंवा अन्यथा सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडण्यास तात्पुरता असमर्थ ठरेल किंवा रजेवर असल्यामुळे किंवा अन्यथा त्याचे मूळ नियुक्तीचे पद रिकामे करावे लागणार नाही अशा प्रकारे गैरहजर राहिला असेल तर, राज्य शासन त्याच्या पदावर स्थानापन्न म्हणून काम करण्यासाठी या अधिनियमान्वयेची किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा विनियम या अन्वयेची त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करू शकेल.

सदस्यांची निरर्हता.

**१४.** (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, एखादी व्यक्ती प्राधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू ठेवण्यास पुढील प्रसंगी निरर्ह ठरेल :—

(अ) ती व्यक्ती प्राधिकरणाच्या अधीन असलेले कोणतेही लाभदायी पद धारण करीत असेल;

(ब) ती व्यक्ती विकल मनाची असेल, आणि ती तशी असल्याचे एखाद्या सक्षम न्यायालयाने घोषित केलेले असेल;

(क) ती व्यक्ती अप्रमाणपत्रित दिवाळखोर किंवा अमुक्त नादार असेल;

(ड) प्राधिकरणाबरोबर किंवा प्राधिकरणाद्वारे किंवा प्राधिकरणाच्यावतीने करण्यात आलेल्या कोणत्याही करारात किंवा नोकरीत त्या व्यक्तीचा स्वतः किंवा कोणत्याही भागीदारांमार्फत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल;

(ई) ती व्यक्ती, प्राधिकरणाबरोबर, प्राधिकरणाद्वारे किंवा प्राधिकरणाच्यावतीने करण्यात आलेल्या कोणत्याही करारात किंवा नोकरीत जिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही विधिसंस्थापित कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा अन्य पगारी अधिकारी असेल; किंवा

(फ) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती व्यक्ती दोषी ठरविण्यात आलेली असेल किंवा दोषी ठरली असेल.

(२) तथापि, (अ) प्राधिकरणाच्या व्यवहारांशी संबंधित असलेली कोणतीही जाहिरात ज्या वृत्तपत्रामध्ये समाविष्ट झालेली आहे अशा कोणत्याही वृत्तपत्रात एखाद्या व्यक्तीचा स्वतःचा किंवा ती व्यक्ती ज्या विधिसंस्थापित कंपनीची संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा अन्य पगारी अधिकारी असेल, त्या कंपनीचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे याच केवळ कारणास्तव, ती व्यक्ती, पोट-कलम (१) च्या खंड (ड) किंवा (ई) अन्वये निरर्ह ठरवली जाणार नाही किंवा या खंडांच्या अर्थानुसार कोणत्याही करारात किंवा नोकरीत तिचा हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही.

(ब) एखादी व्यक्ती, प्राधिकरणाबरोबर, प्राधिकरणाद्वारे किंवा प्राधिकरणाच्यावतीने करण्यात आलेल्या कोणत्याही करारात किंवा नोकरीत जिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे अशा कोणत्याही विधिसंस्थापित कंपनीची भागधारक असल्याच्या कारणावरून केवळ ती व्यक्ती पोट-कलम (१) च्या खंड (ड) किंवा (ई) अन्वये निरर्ह ठरवली जाणार नाही किंवा अशा कंपनीत तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु, अशा व्यक्तीने, तिने धारण केलेल्या भागाचे (शेअरचे) स्वरूप व मर्यादा राज्य शासनाला कळविली पाहिजे.

सदस्यांना काढून टाकणे.

**१५.** (१) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील प्रकारात मोडणाऱ्या कोणत्याही अशासकीय सदस्यास पदावरून काढून टाकता येईल :—

(अ) कलम १४ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही निरर्हतेच्या अधीन, जो निरर्ह आहे किंवा निरर्ह ठरलेला आहे; किंवा

(ब) राज्य शासनाच्या मते ज्यास नियुक्तीच्या पूर्वी किंवा नंतर कोणत्याही गैरवर्तणुकीबाबत दोषी ठरवण्यात आले आहे किंवा ज्याचे सदस्य असण्याचे चालू राहणे हे प्राधिकरणाच्या किंवा सर्वसामान्य जनतेच्या हितसंबंधास अहितकारक ठरेल अशा प्रकारे तो त्याच्या पदाकडे दुर्लक्ष करत असेल किंवा त्याने त्याचा दुरूपयोग केलेला असेल किंवा जो सदस्य म्हणून पदावर राहण्यास अन्य प्रकारे अयोग्य असेल; किंवा

(क) जो प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय, प्राधिकरणाच्या लागोपाठच्या दोन बैठकींना अनुपस्थित राहिला आहे :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस, तिला काढून टाकण्याविरुद्ध कारणे दाखवण्याची संधी दिल्याशिवाय पदावरून काढून टाकता येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या पोट-कलम (१) मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशासकीय सदस्य राज्य शासनाची मर्जी असेल तोवर पद धारण करतील, आणि राज्य शासनाला, जर लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे दिसून आले तर, ते कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे त्या सर्वांना किंवा त्यापैकी कोणासही पदावरून काढून टाकू शकेल.

रिकामी पदे भरणे.

**१६.** (१) एखाद्या सदस्याचे पद रिकामे झाल्याच्या प्रसंगी, ते रिकामे पद राज्य शासनाला भरता येईल, आणि अशा रीतीने नियुक्त केलेली व्यक्ती ही, ज्या सदस्याच्या जागी तिची नियुक्ती करण्यात आली असेल त्या सदस्याने ज्या कालावधीपर्यंत ते पद धारण केले असते, त्या कालावधीपर्यंत ते पद धारण करील.

(२) एखाद्या सदस्याचे रिकामे पद हे, व्यवहार्य होईल तितक्या लवकर भरण्यात येईल; परंतु अशा रीतीने पद रिकामे होईल तेव्हा, पदावर असलेले सदस्य हे अशा रीतीने पद रिकामे झालेच नाही असे समजून काम करतील.

कार्यवाही उचित व विधिग्राह्य असल्याचे मानणे.

**१७.** प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही अन्यथा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, प्राधिकरणाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नेमणुकीत किंवा तिला सदस्य म्हणून पुढे चालू ठेवण्यात, कोणताही दोष असणे किंवा ती निरर्ह असणे, यामुळे ती कृती किंवा कार्यवाही निष्फळ ठरते असे मानण्यात येणार नाही.

प्राधिकरणाची सभा.

**१८.** (१) प्राधिकरण दोन महिन्यांतून किमान एकदा आणि अध्यक्ष निश्चित करील अशा ठिकाणी व अशा वेळी आपली सभा घेईल.

(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी या दोघांच्याही अनुपस्थितीमध्ये, प्राधिकरणांच्या सभेत उपस्थित असलेले सदस्य आपणामधून निवडून देतील असा अन्य कोणताही सदस्य, प्राधिकरणाच्या सभेचा अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(३) प्राधिकरणाच्या सभेमधील सर्व प्रश्नांवर उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल; आणि ज्या कोणत्याही बाबतीत सम-समान मते पडतील त्या बाबतीत, अध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्तीस दुसरे किंवा निर्णायक मत असेल व ती त्याचा वापर करील.

(४) प्राधिकरणाच्या सभेत, पाच सदस्यांची मिळून गणपूर्ती होईल.

(५) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्राधिकरणाच्या सभांना उपस्थित असलेल्या सदस्यांच्या व हजर राहतील अशा इतर व्यक्तींच्या नावांचे व अशा प्रत्येक सभेतील कामकाजाचे कार्यवृत्त, त्या प्रयोजनार्थ ठेवावयाच्या अशा कार्यवृत्त पुस्तकात ठेवण्यात येईल. अशी कार्यवृत्ते कायम करण्यात आल्यावर आगामी सभेत ती स्वाक्षरित करण्यात येतील, आणि प्राधिकरणाच्या कार्यालयीन वेळेत कोणत्याही सदस्यास त्यांचे निरीक्षण करता येईल.

(६) पूर्वगामी तरतुदींच्या अधीनतेने, प्राधिकरणास, त्याचे कामकाज चालवण्याच्या संबंधात त्यास योग्य व इष्ट वाटेल अशा, कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करता येईल.

विशिष्ट प्रयोजनासाठी प्राधिकरणाशी व्यक्तींना तात्पुरते सहयोगी करून घेणे.

**१९.** (१) प्राधिकरणास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्यासाठी जिचे सहाय्य किंवा सल्ला घेण्याची त्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस सहयोगी करून घेता येईल :

परंतु, अशा रीतीने सहयोगी करून घेतलेल्या व्यक्तींची संख्या तीनपेक्षा अधिक असता कामा नये.

(२) कोणत्याही प्रयोजनाकरिता पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाने सहयोगी करून घेतलेल्या एखाद्या व्यक्तीस त्या प्रयोजनाशी संबंधित अशा, प्राधिकरणाच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल परंतु, मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) राज्य शासनास, आदेशाद्वारे, प्राधिकरणाच्या कोणत्याही सभेस हजर राहण्यासाठी आणि राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा बाबींवरील किंवा विषयांवरील प्राधिकरणाच्या चर्चेत भाग घेण्यासाठी आपले प्रतिनिधी पाठवता येतील, परंतु अशा प्रतिनिधींना मतदानाचा हक्क असणार नाही.

समित्यांची रचना.

**२०.** प्राधिकरणास, वेळोवेळी आपल्या सदस्यांमधून, त्यास योग्य वाटेल इतकी संख्या असलेल्या सदस्यांची मिळून एक किंवा अनेक समित्यांची रचना करता येईल व अशा समितीकडे या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी प्राधिकरणास योग्य वाटतील असे त्याचे अधिकार सोपविता येतील.

## प्रकरण चार

### प्राधिकरणाची रचना आणि प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी

अधिनियमाच्या अंमल-बजावणीचे काम ज्यांच्याकडे सोपवावयाचे ते प्राधिकारी.

**२१.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे काम ज्यांच्याकडे सोपवावयाचे ते प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) प्राधिकरण, आणि

(ब) प्राधिकरणाचा अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी.

अधीक्षण व नियंत्रण.

**२२.** प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा प्राधिकरणाच्या सर्वसाधारण अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली असेल.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये.

**२३.** (१) प्राधिकरणाचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांस अधीन राहून प्राधिकरणाची सर्व कार्यकारी कामे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून पार पाडण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींना बाधा न आणता, मुख्य कार्यकारी अधिकारी :—

(एक) प्राधिकरणाच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनाचे पर्यवेक्षण करील आणि या अधिनियमाद्वारे किंवा या अधिनियमाखालील नियमांद्वारे किंवा विनियमांद्वारे त्यास प्रदान करण्यात येतील किंवा त्याच्यावर लादण्यात येतील किंवा या अधिनियमान्वये प्राधिकरणाकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडील आणि अशा अधिकारांचा वापर करील;

(दोन) प्राधिकरणाच्या सर्व अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवील;

(तीन) प्राधिकरणाला येणे असतील अशा सर्व रकमा वसूल करण्यास आणि प्राधिकरणाने द्यावयाच्या असलेल्या सर्व रकमांचे प्रदान करण्यास जबाबदार असेल;

(चार) प्राधिकरणाची सर्व मत्ता व मालमत्ता यांच्या पुरेशा सुरक्षिततेची खात्री करून घेईल;

(पाच) हा अधिनियम व त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम यांच्या तरतुदींस अनुसरून मालमोटार अंतिम स्थानक निधी (ट्रक टर्मिनल फंड) व मालमत्ता यांचे योग्यप्रकारे उपयोजन करण्यास जबाबदार असेल.

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्याला प्रदान करण्यात आलेले कोणतेही अधिकार किंवा त्याच्यावर लादण्यात आलेली कोणतीही कामे प्राधिकरणाच्या मंजुरीने, प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे सोपवता येतील.

अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक.

**२४.** (१) प्राधिकरणास —

(अ) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक वाटतील अशी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे वेळोवेळी निर्माण करता येतील :

परंतु, ज्या पदाचे किमान वेतनमान दरमहा रुपये एक हजार किंवा राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशी दरमहा त्याहून अधिक रक्कम, यापेक्षा अधिक असेल असे कोणतेही पद, प्राधिकरण, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासन या बाबतीतील सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेशिवाय, निर्माण करणार नाही;

(ब) अशी पदे धारण करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांची वेळोवेळी नेमणूक करता येईल; आणि

(क) अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना ते विनियमांद्वारे निश्चित करील असे वेतन, भत्ते व इतर परिलब्धी भूतलक्षी किंवा भविष्यलक्षी प्रभावाने देता येतील.

(२) असे अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये ही, प्राधिकरण, त्या प्रयोजनासाठी केलेल्या विनियमांद्वारे वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाशर्तींचे विनियमांद्वारे विनियमन करणे.

**२५.** प्राधिकरणास, त्या प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या विनियमांद्वारे भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने आपले अधिकारी व कर्मचारी यांचा सेवाप्रवेश व सेवाशर्ती यांचे विनियमन करता येईल; आणि या अधिकाराच्या सामान्यतेस बाध न येता, अशा विनियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल : —

(एक) रजा मंजूर करणे व रजेवर असताना रजा वेतन आणि भत्ते देणे या गोष्टींचे विनियमन करणे;

(दोन) प्रवास किंवा वाहन भत्त्याचे प्रदान प्राधिकृत करणे;

(तीन) सेवेचा कालावधी विनियमित करणे;

(चार) कर्मचाऱ्यांस भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन, उपदान किंवा अनुकंपा भत्ता यांसह कोणतेही सेवानिवृत्तीचे लाभ ज्या शर्तींअन्वये मिळतील त्या शर्ती आणि कर्मचाऱ्यांचे वारस किंवा हयात नातेवाईक यांना असे निवृत्तीवेतन, उपदान किंवा अनुकंपा भत्ता ज्या शर्तींअन्वये मिळेल त्या शर्ती निश्चित करणे;

(पाच) कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी स्थापन करण्यात येईल अशा निवृत्तीवेतन किंवा भविष्य निर्वाह निधीस मालमोटार अंतिम स्थानक निधीतून दिली जाणारी अंशदाने प्राधिकृत करणे;

(सहा) कर्मचाऱ्यास, चौकशीचा निर्णय होईतोपर्यंत निलंबनाच्या कालावधीत वेतनाऐवजी दिला जाणारा निर्वाह भत्ता निश्चित करणे;

(सात) कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर कोणत्याही शर्ती सामान्यतः विहित करणे.

भविष्य निर्वाह निधी.

२६. (१) प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी प्राधिकरण, भविष्य निर्वाह निधी स्थापन करील आणि अशा भविष्य निर्वाह निधीची (यात यापुढे ज्याचा "भविष्य निर्वाह निधी" असा निर्देश करण्यात आला आहे) व्यवस्था, "भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५" मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरणाकडून केली जाईल. १९२५ चा १९.

(२) प्राधिकरणाच्या, जो भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार आहे अशा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या बाबतीत, प्राधिकरण, ते वेळोवेळी ठरवील एवढा अंशदानाचा भाग ते ठरवील अशारीतीने त्या निधीत जमा करील.

प्राधिकरणाचा खर्च.

२७. प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेले वेतन, भत्ते, फी व इतर पारिश्रमिक यांवरील खर्चासह प्राधिकरणांकडून करण्यात येईल असा सर्व खर्च, 'मालमोटार अंतिम स्थानक निधी' तून भागविण्यात येईल.

## प्रकरण पाच

### प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये

प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये.

२८. या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेले अधिकार व त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये याशिवाय प्राधिकरणास आणखी पुढील गोष्टी करता येतील : —

(अ) कोणत्याही इमारती व कोणतीही बांधकामे यांसह मालमोटार अंतिम स्थानक बांधणे, ते सुस्थितीत ठेवणे व त्याची व्यवस्था पाहणे;

(ब) मालमोटार अंतिम स्थानकासाठी आवश्यक असतील अशी कोणतीही साधने, किंवा अवजारे पुरविणे, ती सुस्थितीत ठेवणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे;

(क) कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता संपादन करणे, धारण करणे आणि तिची विल्हेवाट लावणे;

(ड) नियंत्रण क्षेत्र व मालमोटार अंतिम स्थानक यांमध्ये येणाऱ्या व तेथून बाहेर पडणाऱ्या व्यक्ती व वाहने यांच्या येण्याजाण्याचे विनियमन करणे;

(ई) मालमोटार अंतिम स्थानकाच्या उपयुक्त वापराच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट असतील अशा सुविधा व सेवा पुरविणे;

(फ) मालमोटार अंतिम स्थानकाचे परिरक्षण किंवा त्याचे व्यवस्थापन यासाठी वेळोवेळी आवश्यक किंवा इष्ट असतील अशी इतर कामे व कर्तव्ये पार पाडणे;

(ग) नियंत्रण क्षेत्रामधील माल परिवहन उद्योगातील चढउतार व बदल शोधून काढण्यासाठी आधारसामग्री गोळा करणे आणि अभिलेख व आकडेवारीची माहिती ठेवणे व आवश्यक ते संनियंत्रण ठेवणे.

फी बसवण्याचे प्राधिकरणाचे अधिकार.

**२९.** (एक) रस्ते, गटारे यांचे परिरक्षण, पाणीपुरवठा, माल साठवणी, वाहनतळ यांसाठी तरतूद आणि मालमोटार अंतिम स्थानकाच्या ठिकाणी रस्त्यावरील दिवाबत्तीच्या तरतुदींसह प्राधिकरणाकडून पुरविण्यात येतील अशा इतर सुविधा, सुखसोयी किंवा सेवा यांवरील प्राधिकरणाचा खर्च भरून काढण्यासाठी, आणि

(दोन) मालमोटार अंतिम स्थानकात व्यक्ती, वाहने आणि माल यांना प्रवेश देण्यासाठी, विनियमांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा दरांनी, आणि अशा व्यक्तींवर फी किंवा सेवा आकार बसवण्यास व वसूल करण्यास प्राधिकरण सक्षम असेल.

प्राधिकरणाना अनुदान देणे खर्चातील वाटा उचलणे, इत्यादीचा अधिकार.

**३०.** कलम २८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता प्राधिकरण, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार आपल्या कार्यक्षेत्रातील किंवा कार्यक्षेत्राबाहेरील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा सार्वजनिक उपक्रमास, मालमोटार अंतिम स्थानकावरील कोणत्याही सोयी, सुविधा किंवा सेवा यांच्यासंबंधातील आपली कोणतीही सांविधिक कार्ये पार पाडताना त्याने केलेल्या किंवा त्याच्याकडून करण्यात यावयाच्या खर्चापोटी—यात जमिनीच्या संपादनावरील खर्चाचा समावेश आहे—अनुदाने, आगाऊ रकमा किंवा कर्जे देऊ शकेल किंवा त्याच्या खर्चातील वाटा उचलू शकेल; आणि त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरण अशा स्थानिक प्राधिकरणाशी किंवा उपक्रमाशी विचारविनिमय केल्यानंतर वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अटी व शर्ती यांना अधीन राहून, अशी अनुदाने, आगाऊ रकमा किंवा कर्ज अथवा खर्चातील वाटा अशा स्थानिक प्राधिकरणाने किंवा उपक्रमाने स्वीकारणे हे विधिसंमत असेल.

## प्रकरण सहा

### अर्थसंकल्प, वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा, इत्यादी

प्राधिकरणास अर्थसंकल्प सादर करणे.

**३१.** (१) प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात व्हावयाच्या विशेष सभेत प्राधिकरणाचा पुढील वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज प्राधिकरणापुढे मांडील.

(२) असा प्रत्येक अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा नमुन्यात तयार करण्यात येईल आणि त्यात पुढील गोष्टींसाठी तरतूद करण्यात येईल,—

(एक) पुढील वर्षात प्राधिकरणाने पूर्णतः किंवा अशंतः अंमलात आणावयाचे ठरविलेले प्रस्ताव, योजना व प्रकल्प;

(दोन) प्राधिकरणाच्या सर्व दायित्वांची यथोचितरीत्या पूर्तता; आणि

(तीन) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी;

आणि अशा अर्थसंकल्पात पुढील वर्षाच्या भांडवली व महसुली लेख्यांवरील अंदाजित जमा व खर्च आणि राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे प्राधिकरणाची वित्तविषयक कामगिरी दर्शविणारा इतर तपशील असलेले निवेदन अंतर्भूत असेल, अर्थसंकल्पात वित्तीय खर्च व कार्य स्पष्टपणे दर्शवण्यात येईल.

अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देणे. **३२.** प्राधिकरण, कलम ३१ अन्वये त्यास सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार करील व राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा तारखेस किंवा त्यापूर्वी फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय त्याला मान्यता देईल.

मान्यता दिलेला अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासनास सादर करणे. **३३.** (१) लगतपूर्वीच्या कलमान्वये प्राधिकरणाने मान्य केलेला प्रत्येक अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासनाकडे माहितीकरिता सादर करण्यात येईल.

(२) मान्यता मिळालेला प्रत्येक अर्थसंकल्पीय अंदाज मिळाल्यानंतर राज्य शासनास, व्यवहार्य होईल तेथवर, पुढील वर्ष सुरू होण्यापूर्वी त्यास योग्य वाटतील असे फेरफार अर्थसंकल्पात करण्याविषयी प्राधिकरणास सुचवता येईल आणि प्राधिकरण त्यास योग्य वाटेल अशा रीतीने अर्थसंकल्पीय अंदाजात फेरफार करील.

पूरक अर्थसंकल्प. **३४.** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, प्राधिकरणाने ज्या वर्षाच्या अर्थसंकल्पास मान्यता दिली असेल त्या वर्षात, कोणत्याही वेळी प्राधिकरणाकडे पूरक अर्थसंकल्पीय अंदाज मांडता येईल; आणि अशा पूरक अर्थसंकल्पीय अंदाजास कलमे ३१, ३२ व ३३ च्या तरतुदी शक्य होईल तेथवर लागू होतील.

प्राधिकरणाच्या मत्तेचा विनियोग. **३५.** प्राधिकरणाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर सर्व मत्ता ही, प्राधिकरण, या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून आणि त्यांच्या प्रयोजनांसाठीच धारण करील व तिचा विनियोग करील.

मालमोटार अंतिम स्थानक निधी. **३६.** (१) प्राधिकरणाचा मालमोटार अंतिम स्थानक निधी नावाचा स्वतःचा निधी असेल व ते असा निधी ठेवील; त्यात पुढीलप्रमाणे रकमा जमा करण्यात येतील :—

(अ) प्राधिकरणाला मिळालेली अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे, आगाऊ रकमा म्हणून किंवा अन्य प्रकारे मिळालेल्या सर्व रकमा;

(ब) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी कोणत्याही सांविधिक प्राधिकरणाकडून मिळालेल्या सर्व रकमा;

(क) या अधिनियमान्वये प्राधिकरणास मिळालेली सर्व फी, वादखर्च, दंड व आकारणीच्या रकमा;

(ड) जमिनी, इमारती व इतर जंगम व स्थावर मालमत्ता यांची विल्हेवाट लावल्यानंतर आणि इतर व्यवहारामधून प्राधिकरणाला मिळालेल्या सर्व रकमा;

(इ) भाडे व नफा म्हणून किंवा इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही साधनांपासून प्राधिकरणास मिळालेल्या सर्व रकमा;

(२) मालमोटार अंतिम स्थानक निधीमध्ये जमा झालेली रक्कम ही, भारतीय स्टेट बँकेत किंवा बँक व्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७०, याच्या पहिल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या किंवा बँक व्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तत्सम नवीन बँकेमध्ये किंवा या प्रयोजनार्थ राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सहकारी बँकेमध्ये ठेवण्यात येईल व त्या बँकेत ती गुंतवण्यात येईल. १९७० चा ५०. १९८० चा ४०.

(३) मालमोटार अंतिम स्थानक निधीची खाती प्राधिकरण यासंबंधात केलेल्या विनियमांद्वारे प्राधिकृत करील अशा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून व अशा रीतीने चालवण्यात येतील.

**३७.** प्राधिकरणाला, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने स्वतःसाठी पुरेशा साधनसंपत्तीची तरतूद करण्यासाठी रक्कम कर्जाऊ घेता येईल. रक्कम कर्जाऊ घेण्याचा प्राधिकरणाचा अधिकार.

**३८.** प्राधिकरणाला या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुरःसरणार्थ, ज्यांना जमिनी, इमारती किंवा जागा यांचे वाटप किंवा विक्री करण्यात आली असेल किंवा करण्यात येण्याचा संभव असेल अशा व्यक्तींकडून, प्राधिकरणांकडून किंवा संस्थांकडून त्यास योग्य वाटेल अशा शर्तींवर, ठेवी स्वीकारता येतील. ठेवी.

**३९.** (१) प्राधिकरण नियमांप्रमाणे आवश्यक अशी लेखा पुस्तके व अशी इतर पुस्तके ठेवण्याची व्यवस्था करील आणि नियमानुसार लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील. लेखे व लेखापरीक्षा.

(२) प्राधिकरण, राज्य शासन, निदेश देईल अशा पुढील अनुवर्ती वर्षातील तारखेपर्यंत आणि अशा व्यक्तींकडून, दरवर्षी त्याचे लेखे तपासून घेण्याची व्यवस्था करील. अशा तऱ्हेने निदेश देण्यात आलेल्या व्यक्तीस, पुस्तके, लेखे व संबंधित प्रमाणके, दस्तऐवज व कागदपत्रे हजर करण्याची मागणी करण्याचा अधिकार असेल, आणि त्यास प्राधिकरणाच्या कोणत्याही कार्यालयांची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(३) प्राधिकरणाच्या लेख्यांची परीक्षा पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरण, प्राधिकरणाच्या लेख्यांची प्रत, लेखा-परीक्षकाच्या त्यावरील अहवालाच्या प्रतीसह, शक्य तितक्या लवकर राज्य शासनास पाठवील; आणि प्राधिकरण, लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या अवलोकनानंतर राज्य शासनास जे निदेश देणे योग्य वाटेल अशा निदेशाचे अनुपालन करील.

(४) लेखे, लेखापरीक्षकांच्या अहवालासह; शक्य असेल तेथवर ते ज्या वर्षासंबंधीचे असतील त्याच्या लगतनंतरचे वर्ष संपण्यापूर्वी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येतील.

**४०.** (१) कलम ३९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी प्राधिकरणाच्या लेख्यांची समवर्ती लेखापरीक्षा, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून करण्यात येईल. राज्य शासनासुद्धा त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींकडून, एखादा विशिष्ट व्यवहार किंवा व्यवहारांचा वर्ग किंवा व्यवहारांची मालिका किंवा विशिष्ट कालावधीतील व्यवहार या बाबींच्या संबंधात प्राधिकरणाच्या लेख्यांची विशेष लेखापरीक्षा करण्याबाबत निदेश देता येतील. लेख्यांची समवर्ती व विशेष परीक्षा.

(२) जेव्हा पोट-कलम (१) अनुसार आदेश काढण्यात येईल तेव्हा प्राधिकरण, पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे असे लेखे लेखापरीक्षेसाठी सादर करील किंवा सादर करण्याची व्यवस्था करील आणि उक्त व्यक्तीला लेखापरीक्षेच्या प्रयोजनार्थ आवश्यक वाटेल अशी माहिती सादर करील; आणि अशा व्यक्तीद्वारे दाखवून दिलेले दोष राज्य शासनाने माफ केले नसतील तर, असे दोष काढून टाकण्याची उपाययोजना करील किंवा उपाययोजना करण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सात

### जमिनीचे संपादन

१८९४ चा १. **४१.** राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या भूमिसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये सक्तीने जमीन संपादन करता येईल आणि कोणत्याही उक्त प्रयोजनासाठी, कोणत्याही जमिनीचे केलेले संपादन हे, त्या अधिनियमाच्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी केलेले आहे असे समजण्यात येईल. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जमीन संपादन करण्याचा अधिकार.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने किंवा इतर कोणत्याही सांविधिक महामंडळाने हस्तांतरित केलेल्या जमिनी, इत्यादी मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाकडे निहित होणे.

**४२.** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ यामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये स्थापन करण्यात आलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा अशा इतर कोणत्याही कायद्याखाली स्थापन करण्यात आलेले कोणतेही सांविधिक महामंडळ हे राज्य शासन महानगर प्राधिकरणाशी किंवा सांविधिक महामंडळाशी वेळोवेळी विचारविनिमय करून ठरवील अशा अटी व शर्तीस अधीन राहून कोणतीही जमीन, त्यावर बांधलेली इमारत अथवा त्या जमिनीवर केलेले कोणतेही बांधकाम यासह किंवा त्याविना मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यास सक्षम असेल; आणि त्यानंतर या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अशी जमीन, तिच्यावरील इमारती किंवा बांधकाम, कोणतेही असल्यास, त्यासह मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाकडे निहित होईल.

१९७५ चा महा. ४.

१९७५ चा महा. ४

शासकीय जमीन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे.

**४३.** (१) या अधिनियमाच्या उद्देशाच्या पुरःसरणार्थ राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासन आणि प्राधिकरण यांच्यामध्ये संमत होतील अशा अटींवर राज्य शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनी प्राधिकरणाकडे सोपवील.

(२) प्राधिकरणाकडून किंवा प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आणि देखरेखीखाली अशा कोणत्याही जमिनीचा विकास करण्यात आल्यानंतर या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा विनियमांच्या तरतुदींनुसार आणि राज्य शासनाने याबाबतीत कोणतेही निदेश दिलेले असल्यास त्या निदेशांनुसार प्राधिकरणाकडून तिच्या संबंधातील कार्यवाही करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीची राज्य शासनास त्यानंतर कोणत्याही वेळी गरज भासेल त्याबाबतीत, प्राधिकरण, परस्परामध्ये ठरविण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, ती जमीन राज्य शासनाला परत करील.

जमीन इत्यादींची विल्हेवाट लावण्याचा प्राधिकरणाचा अधिकार.

**४४.** या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, प्राधिकरणाला त्याच्याकडे निहित असलेली कोणतीही जमीन, कोणतीही इमारत, किंवा इतर मालमत्ता या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा रीतीने आपल्या ताब्यात ठेवता येईल; ती भाडेपट्ट्याने देता येईल, तिची विक्री करता येईल, तिची अदलाबदल करता येईल किंवा अन्य प्रकारे तिची विल्हेवाट लावता येईल.

## प्रकरण आठ

### अपराध व शास्ती

अपराध व शास्ती.

**४५.** (१) जो कोणी, —

(अ) कलम ६ च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील; किंवा

(ब) कलम ५० च्या खंड (अ) अन्वये निरीक्षणाचे काम पार पाडण्यात किंवा खंड (ब) खालील चौकशी करण्यात प्राधिकृत अधिकाऱ्याला स्वेच्छेने अडथळा आणील; किंवा

(क) कलम ५० च्या खंड (क) किंवा (ड) अन्वयेच्या कोणत्याही आवश्यक गोष्टीचे पालन करण्यात जाणूनबुजून कसूर करील किंवा खोटी विवरणे, विवरणपत्रे, लेखे, किंवा कार्यवृत्ते जाणूनबुजून सादर करील; किंवा

(ड) कलम ५१ अन्वये कोणतीही माहिती पुरवण्यात जाणूनबुजून हयगय करील किंवा त्यास नकार देईल किंवा जाणूनबुजून खोटी माहिती पुरवील; किंवा

(इ) कलम ५२ अन्वये प्राधिकरणाची पुस्तके, अभिलेख, निधी किंवा मालमत्ता जप्त करण्यात किंवा ताब्यात घेण्यात प्राधिकृत अधिकाऱ्याला जाणूनबुजून अडथळा आणील; किंवा

(फ) खंड (अ) ते (इ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृती करण्यास कोणत्याही व्यक्तीस मदत करील किंवा अपप्रेरणा देईल, —

त्यास दोषसिद्धीनंतर, —

(एक) जेव्हा अपराध खंड (अ) किंवा (ब) खालील असेल तेव्हा, कमीत कमी तीन महिन्यांची परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा किंवा किमान पाच हजार रुपये परंतु दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होतील;

(दोन) जेव्हा अपराध खंड (क), (ड) किंवा (इ) खालील असेल तेव्हा, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढी साध्या कैदेची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होतील;

(तीन) जेव्हा अपराध खंड (फ) खालील असेल तेव्हा, मदत करणे किंवा अपप्रेरणा देणे या अपराधाबद्दल तरतूद करण्यात आलेली शिक्षाच होईल;

(चार) जेव्हा खंड (अ) किंवा (ब) खालील अपराध चालू राहिला असेल त्या बाबतीत, पहिल्या अपराधसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल, किमान शंभर रुपये, परंतु एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या आणखी दंडाची शिक्षा होईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अपराधांची दखल घेणाऱ्या न्यायालयास, त्यास आवश्यक वाटेल असा पुरावा घेतल्यावर असे वाटेल की, कलम ६ च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून मालमोटार अंतिम स्थानकातील जागेव्यतिरिक्त, नियंत्रण क्षेत्रातील कोणत्याही जागेमध्ये आरोपी व्यक्ती स्वतः किंवा एजंट म्हणून मालवाहनाद्वारे वाहून नेण्यात येणारा माल गोळा करणे, पुढे पाठवणे किंवा त्याचे वितरण करणे हा व्यवसाय चालवीत आहे तर ते न्यायालय पुढीलप्रमाणे आदेश देऊ शकेल :—

(एक) वाहतूक करणारे वाहन जप्त करण्यात यावे आणि प्राधिकरणाच्या ताब्यामध्ये ठेवण्यात यावे; किंवा

(दोन) ती आरोपी व्यक्ती तक्रार अंतिमतः निकालात निघेपर्यंत कलम ६ च्या तरतुदींचे उल्लंघन करून मालमोटार अंतिम स्थानकातील जागेव्यतिरिक्त नियंत्रण क्षेत्रातील कोणत्याही जागेवर, असा व्यवसाय चालविणार नाही.

(३) कलम ६ च्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल जेव्हा अशा कोणत्याही आरोपी व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्यात आले असेल तेव्हा ज्या परिवाहनाच्या संबंधात पोट-कलम (२) अन्वये कोणताही आदेश काढण्यात आला असेल ते परिवाहन राज्य शासनाकडे जप्त करता येईल आणि जेथे अशी व्यक्ती दोषमुक्त किंवा आरोपमुक्त झाली असेल त्याबाबतीत असे परिवाहन जप्त करून प्राधिकरणाच्या ताब्यामध्ये ठेवले असेल तर ते तिला परत करण्यात येईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**४६.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध, कंपनीकडून करण्यात आला असेल तेव्हा अपराध घडला त्यावेळी, कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी, कंपनीचा प्रभार असलेली आणि कंपनीला जबाबदार असणारी प्रत्येक व्यक्ती तसेच ती कंपनी अपराधाबद्दल दोषी मानली जाईल आणि तिच्याविरुद्ध खटला भरण्यास आणि तदन्वये शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, तो अपराध आपल्याकडून नकळत झाला असे कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले किंवा असा अपराध होण्याचे थांबविण्यासाठी तिने यथोचित ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशा व्यक्तीस कोणत्याही शिक्षेस पात्र ठरविता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या कलमाखालील अपराध कंपनीने केलेला असेल, आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अधिकारी यांच्या संमतीने अथवा त्यांच्या मूकानुमतीने घडलेला असल्याचे अथवा त्याने केलेल्या कोणत्याही हयगयीशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्याजोगा असल्याचे सिद्ध झाले तर असा संचालक व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्यावर खटला भरला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण :** — या कलमाच्या प्रयोजनांसाठी, —

(अ) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ, एक निगम निकाय असा असून त्यात भागीदारी संस्था, व्यक्तींची संघटना किंवा व्यक्तींचा संघ, मग तो विधिसंस्थापित असो वा नसो, यांचा समावेश होतो; आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" या संज्ञेचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील एक भागीदार, आणि व्यक्तीच्या कोणत्याही संघटनेच्या संबंधात किंवा व्यक्तीच्या संघाच्या संबंधात त्या कंपनीच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणारा कोणताही सदस्य असा होतो.

अपराधाची दखल व न्याय चौकशी.

**४७.** (१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या पूर्वमंजुरीशिवाय, कोणतेही न्यायालय घेणार नाही.

(२) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्गाच्या न्यायदंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाहून कमी दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील शिक्षापात्र असलेल्या अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

वाढीव शास्ती लादण्याचा दंडाधिकाऱ्यांचा अधिकार.

**४८.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याने किंवा कोणत्याही प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याने, उक्त, कलमाखालील त्याच्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरून या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही शिक्षा देणे विधिसंमत असेल. १९७४ चा २.

अपराधांचा सामोपचाराने निकाल करणे.

**४९.** (१) या अधिनियमान्वये, कलम ६ च्या उल्लंघनाशी संबंधित असेल अशा अपराधाव्यतिरिक्त, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, एकतर अशा अपराधाबद्दल खटला दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर अशा अपराधासंबंधात दोषारोप केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अशा अपराधाबाबत तडजोडीची रक्कम म्हणून तो ठरवील अशी, अधिकतम दंडाच्या रकमेपेक्षा कमी नसेल आणि कलम ४५ मध्ये उल्लेखिलेल्या प्रस्तुत अपराधाकरिता असलेल्या अधिकतम दंडाच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम प्राधिकरणाच्या संमतीने स्वीकारता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात आलेल्या अशा रकमेचा भरणा केल्यानंतर त्याच अपराधाच्या संबंधात आरोप असलेल्या व्यक्तीविरुद्ध त्यापुढे आणखी कार्यवाही करण्यात येणार नाही आणि तशी कोणतीही कार्यवाही जर आधीच करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल आणि आरोप असलेली व्यक्ती अभिरक्षेत असेल तर तिला मुक्त करण्यात येईल.

## प्रकरण नऊ

## संकीर्ण

तपासणी, चौकशी, सादर करणे इत्यादी.

५०. (१) याबाबतीत राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश "प्राधिकृत अधिकारी" असा करण्यात आला आहे) पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) प्राधिकरणाचे, मालमोटार अंतिम स्थानकाचे व प्राधिकरणाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या अन्य कोणत्याही आस्थापनेचे लेखे व त्यांची कार्यालये यांची तपासणी करणे किंवा तपासणी करविणे;

(ब) प्राधिकरणाच्या व्यवहारांची चौकशी करणे;

(क) अशा प्राधिकरणाने जे सादर करणे आवश्यक आहे असे त्यास वाटेल असे कोणतेही विवरण, विवरणपत्र, लेखे किंवा अहवाल मागविणे;

(ड) प्राधिकरणाची कार्यवृत्ते मागविणे व त्यांची तपासणी करणे;

(इ) प्राधिकरणासः—

(एक) अशा प्राधिकरणाकडून किंवा त्यांच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल ती करण्याविरुद्ध जी कोणतीही हरकत आहे असे त्यास वाटत असेल अशी कोणतीही हरकत विचारात घेण्यास सांगणे आणि अशी गोष्ट करण्यासाठीची आपली कारणे विनिर्दिष्ट किंवा वाजवी वेळात लेखी स्वरूपात देण्यास सांगणे; किंवा

(दोन) तो पुरवू शकेल अशा ज्या कोणत्याही माहितीमुळे अशा प्राधिकरणाने विवक्षित गोष्ट करणे आवश्यक आहे असे त्यास वाटत असेल अशी कोणतीही माहिती विचारात घेण्यास सांगणे आणि अशी गोष्ट न करण्याबद्दलची आपली कारणे विनिर्दिष्ट किंवा वाजवी वेळात लेखी स्वरूपात देण्यास सांगणे;

(फ) जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल अशी कोणतीही गोष्ट उत्तराचा विचार चालू असताना, केली जाई नये याबद्दल निदेश देणे; आणि

(ग) जी कोणतीही गोष्ट करण्यात आली पाहिजे, परंतु ती केली जात नसेल अशी कोणतीही गोष्ट तो विनिर्दिष्ट करील करण्यात येईल अशा मुदतीच्या आत करण्यात यावी याबद्दल निदेश देणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशांचे किंवा काढलेल्या निदेशांचे पालन करण्यात प्राधिकरण कसूर करील त्याबाबतीत, प्राधिकृत अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास अशा आदेशाचे पालन करण्याबाबत निदेश देऊ शकेल व मुख्य कार्यकारी अधिकारी ताबडतोब अशा निदेशाचे पालन करील.

**अधिकारी, कर्मचारी, किंवा सदस्य यांचे प्राधिकृत अधिकाऱ्यास माहिती पुरविण्याबाबतचे कर्तव्य.** ५१. (१) प्राधिकृत अधिकाऱ्याने त्याला तसे करणे भाग पाडले तर (अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी धरून) प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी, कर्मचारी अथवा सदस्य हा प्राधिकरणाच्या व्यवहाराबाबत किंवा कामकाजाबाबत, त्याच्या ताब्यात असलेली माहिती प्राधिकृत अधिकाऱ्यास पुरवील.

(२) कलम ५० अन्वये प्राधिकरणाच्या व्यवहारांची चौकशी करणाऱ्या किंवा कार्यवृत्तांची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ द्वारे दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत तरतूद केलेल्या उपायांनी व शक्य होईल तेथवर त्याच रीतीने, प्राधिकरणाचा अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यासह त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कर्मचाऱ्यास किंवा सदस्यास, बोलावण्याचे व हजर करून साक्ष देण्यास व दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडण्याचे अधिकार असतील. त्यानंतर तो अधिकारी, त्याने अशा रीतीने केलेल्या चौकशीचा किंवा तपासणीचा अहवाल राज्य शासनाला सादर करील. १९०८ चा ५.

**लेखापुस्तके व इतर दस्तऐवज, इत्यादी जप्त करणे.** ५२. राज्य शासनास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास, प्राधिकरणाची पुस्तके व अभिलेख यांत फिरवाफिरव होण्याची किंवा ते नष्ट केले जाण्याची शक्यता आहे किंवा प्राधिकरणाचे निधी किंवा मालमत्ता यांची अफरातफर किंवा अपयोजन होण्याचा संभव आहे असे सकारण वाटत असेल तर, प्राधिकृत अधिकारी, प्राधिकरणाची अशी पुस्तके व अभिलेख, निधी व मालमत्ता जप्त करू शकेल व त्याचा ताबा घेऊ शकेल आणि अशा पुस्तकांच्या, अभिलेखांच्या व मालमत्तांच्या अभिरक्षेस जबाबदार असलेले (अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी धरून) प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मचारी अथवा सदस्य हे अशी पुस्तके इत्यादी प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाधीन करतील.

**राज्य शासनाचे नियंत्रण.** ५३. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता राज्य शासनाने वेळोवेळी आखून दिलेले धोरण व घालून दिलेली कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे यांनुसार प्राधिकरण, या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करील व आपली कर्तव्ये पार पाडील.

(२) लोकहिताच्या दृष्टीने या अधिनियमाच्या कार्यक्षम अंमलबजावणीकरिता राज्य शासनाकडून वेळोवेळी घालून देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करणे प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

(३) या अधिनियमाखालील प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर व कर्तव्यांचे पालन यांच्यासंबंधात प्राधिकरण व राज्य शासन यांच्यामध्ये कोणताही विवाद उद्भवल्यास राज्य शासनाकडून त्या बाबीच्या संबंधात निर्णय करण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**वार्षिक अहवाल.** ५४. (१) प्राधिकरण, प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस, शक्य तितक्या लवकर, मागील वित्तीय वर्षातील आपल्या कार्यांचा अहवाल, मागील वर्षाच्या जमा रकमा व वितरित रकमा यांचे विवरण व मागील वर्षातील मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरण निधीतील पैशांच्या व्यवहाराचे विवरण देणारा अहवाल तयार करील व तो राज्य शासनाला सादर करील. तसेच पुढील वित्तीय वर्षात प्राधिकरणाकडून हाती घेण्यात यावयाच्या कोणत्याही कार्याची माहिती देखील या अहवालात देण्यात येईल.

(२) असा प्रत्येक अहवाल राज्य शासनाला सादर करण्यात आल्यानंतर राज्य शासन, तो अहवाल शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे मांडण्याची व्यवस्था करील.

**५५.** (१) प्राधिकरणाचा अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य व इतर अधिकारी आणि कर्मचारी हे या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम यानुसार काम करीत असताना किंवा त्यांनी तसे करणे अभिप्रेत असताना ते भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. (१८६० चा ४५.) (प्राधिकरणाचा अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य व इतर अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.)

**५६.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम याअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीबद्दल प्राधिकरणाचा अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध किंवा राज्य शासनाविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. (सद्भावपूर्वक करण्यात आलेल्या कृतीचे संरक्षण.)

**५७.** कोणताही आकार, परिव्यय, खर्च, फी, भाडे, भरपाई यांपोटी किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा विनियमाच्या तरतुदींखाली कोणत्याही कारणा-करिता किंवा प्राधिकरणाशी केलेल्या कोणत्याही करारान्वये प्राधिकरणाला देय असलेली कोणतीही रक्कम, अशी रक्कम ज्या व्यक्तींकडून देय असेल तिच्याकडून जमीन महसुलीच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल. (प्राधिकरणाला देय असणाऱ्या रकमांची वसुली.)

**५८.** मुंबई भाडे नियंत्रण व हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ किंवा त्या त्यावेळी राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेला इतर कोणताही तत्सम कायदा — (१९४७ चा ५७.) (प्राधिकरणाच्या जमिनी, इमारती, इत्यादींना भाडे नियंत्रण कायदा लागू नसणे.)

(अ) प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा या अधिनियमान्वये किंवा त्यांच्या प्रयोजनाकरिता प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीला, इमारतीला किंवा जागेला लागू होणार नाही;

(ब) प्राधिकरणाद्वारे निर्माण केलेली कोणत्याही जमिनींशी, इमारतींशी किंवा जागांशी संबंधित अशी कोणतीही कुळवहिवाट, लायसन किंवा तत्सम इतर संबंध यांस प्राधिकरणास प्रतिकूल होईल अशा प्रकारे लागू होणार नाही;

(क) परंतु प्राधिकरणाला भाड्याने दिलेली कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा जागा यांना लागू होईल.

**५९.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम तयार करता येतील; (नियम तयार करण्याचा अधिकार.)

(२) या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन असतील;

(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक निमय, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या

लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम यथास्थिती अंमलात येईल किंवा येणार नाही तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचे अधिकार.

**६०.** प्राधिकरणास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने विनियमांद्वारे या अधिनियमान्वये तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याची कामे पार पाडण्यासाठी ज्या बाबींकरिता तरतूद करणे त्यास आवश्यक वाटेल अशा इतर सर्व बाबींसाठी, या अधिनियमाशी आणि त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असे विनियम करता येतील.

अडचणी दूर करणे.

**६१.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुसार, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, नियत दिवसापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

---

शा. मु. वाई–१२ पानी २,५०० पु.–२-२०१६–एच-७७*

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई—४०० ००४.
  फोन : ०२२/२३६ ३२६ ९३, २३६ ३०६ ९५,
  २३६ ३११ ४८, २३६ ३४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार,
  जी. पी. ओ. नजिक, पुणे—४११ ००१.
  फोन : ०२०/२६१ २५८ ०८, २६१ २८९ २०

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर—४४० ००१.
  फोन : ०७१२/२५६ २६ १५, २५६ २८ १५

- **सहाय्यक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार
  पैठण रोड, रेल्वे स्टेशन,
  औरंगाबाद—४३१ ००१.
  फोन : ०२४०/२३३ १४ ६८, २३३ ११ ०९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर—४१६ ००३.
  फोन : ०२३१/२६५ ०३ ९५, २६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**